नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - ३३२ Issue - 332 | वार रविवार दि. २० एप्रिल २०२५ Blow- Sunday Date 20 April 2025 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राज-उद्धव एकत्र येणार?

## राज्याच्या हितासाठी किरकोळ भांडणं बाजूला ठेवायला तयार : उद्धव ठाकरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आमच्यातले (उद्धव ठाकरेंसोबतचे) वाद, भांडणं छोटी आ-हेत. महाराष्ट्र मोठा आहे. त्यामुळे एकत्र येणं, राहणं कठीण नाही, असं मोठं विधान मनसेप्रमुख राज ठाकरेंनी केलं आहे. मराठी दिग्दर्शक महेश मांजरेकर यांनी राज ठाकरेंची मुलाखत घेतली. या मुलाखतीमध्ये राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंसोबतच्या युतीवर भाष्य केलं आहे.

राज ठाकरेंच्या या विधानानंतर आता शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. एकप्रकारे राज ठाकरेंच्या टाळीला उद्धव ठाकरेंनी प्रतिसाद दिला आहे.

राज्याच्या हितासाठी किरकोळ भांडणं बाजूला ठेवायला मी देखील तयार आहे, उद्धव ठाकरेंनीही सांगितलं.

आपल्याकडून भांडणं नव्हती ती मिटवून टाकली, असं देखील उद्धव ठाकरेंनी स्पष्ट केलं. आपल्यासोबत जाऊन महाराष्ट्राचा फायदा आहे की भाजपसोबत जाऊन ते आधी ठरवा, असंही उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे.

किरकोळ भांडणे बाजूला ठेवायला मी तयार आहे,मी सर्व मराठी माणसांना महाराष्ट्रसाठी एकत्र येण्याचं आवाहन आहे. पण एक अट आहे, जेव्हा आम्ही लोकसभेला सांगत होतो, हे सगळे उद्योग घेऊन गुजरा-तला जात आहेत, तेव्हाच विरोध केला असता तर महाराष्ट्र हिताचं सरकार केंद्रात आणि राज्यात बसवू शकलो असतो. तेव्हा पाठिंबा द्यायचा, आता विरोध करायचा मग परत तडजोड करायची हे असं चालणार नाही, असं उद्धव ठाकरे म्हणाले.



महाराष्ट्र हिताच्या आड जो कोणी येईल, त्याचं स्वागत मी करणार नाही, त्याला घरी मी बोलवणार नाही, त्याच्यासोबत पंक्तीला बसणार नाही, त्याचं आगत स्वागत करणार नाही, हे पहिलं ठरवा, मग महाराष्ट्र हिताच्या गोष्टी करा. बाकी आमच्यातली भांडणं मी आज सांगतो, जी भांडणं माझ्याकडून नव्हतीच, ती मी मिटवून टाकली चला, पण पहिलं हे ठरवा, असं उद्धव ठाकरेंनी स्पष्ट केले. उद्धव ठाकरे भारतीय कामगार सेनेच्या कार्यक्रमात बोलत होते.

राज ठाकरे काय म्हणाले होते?- मराठी दिग्दर्शक महेश मांजरेकरांनी राज ठाकरेंची मुलाखती घेतली. या मुलाखतीमध्ये शिवसेनेसोबत अजूनही एकत्र येऊ शकता का? असा प्रश्न विचारण्यात आला. यावर या महाराष्ट्राच्या आणि मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी ही भांडणं, हे वाद या गोष्टी अत्यंत शुल्लक आहेत. त्यामुळे एकत्र येणं आणि एकत्र राहाणं, यात काही मला कठीण गोष्ट आहे असं वाटत नाही. परंतु विषय फक्त इच्छेचा आहे. हा एकट्या माझ्या इच्छेचा विषय नाही आणि माझ्या स्वार्थाचाही विषय नाही, असं राज ठाकरे म्हणाले.

मला असं वाटतं, लार्जर पिक्चर बघणं गरजेचं आहे, असं राज ठाकरेंनी सांगितले. तसेच सगळ्या महाराष्ट्रातील राजकीय पक्षातील मराठी लोकांनी एकत्र येऊन एकच पक्ष काढावा, असं विधानही राज ठाकरेंनी केलं आहे.

# तंत्रज्ञानाच्या सहाय्याने दर्जेदार आरोग्यसेवा दुर्गम भागांपर्यंत पोहोचवा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




मुंबई : आरोग्यसेवेच्या सुविधांसाठी महाराष्ट्र एक महत्त्वपूर्ण केंद्र बनले आहे. राज्यात सर्व प्रकारच्या दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध आहेत. ही गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत, अतिदुर्गम भागात राहणाऱ्या व्यक्तीपर्यंत पोहोचली पाहिजे. यासाठी डॉक्टरांची, तज्ञांची मदत आवश्यक असून आजच्या तंत्रज्ञानाच्या मदतीने आपण या शेवटच्या व्यक्तीपर्यंत आरोग्यसेवा पोहोचवू शकतो, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत २२ व्या मुंबई लाईव्ह इंडोस्कोपी अवॉर्ड २०२५ चे वितरण करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी डॉ.अमित मायदेव, डॉ.तरंग ग्यानचंदानी, देश विदेशातील डॉक्टर्स आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, देशातील प्रत्येक व्यक्तीला दर्जेदार, सुलभ आणि परवडणारी आरोग्यसेवा मिळणे अत्यंत गरजेचं असून दर्जेदार आरोग्यसेवा देण्याचा आमचा प्रयत्न आहे. गेल्या दोन वर्षांमध्ये महाराष्ट्रात दहा नवीन वैद्यकीय महाविद्यालयांची स्थापना करण्यात आली आहे. त्यामुळे आपल्याला मोठ्या प्रमाणात डॉक्टरांची व आरोग्य सेवकांची गरज असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

इंडोस्कोपी क्षेत्रात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या डॉक्टरांचा यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला आहे. यात महाराष्ट्रातील डॉ.राधिका चव्हाण यांना 'वूमन इन इंडोस्कोपी' अवॉर्ड, चंडीगड येथील डॉ. सुरेंदर राणा यांना 'इंडोस्कोपी एज्युकेटर' अवॉर्ड, ओडिशाचे डॉ.आशुतोष मोहपात्रा यांना 'लीडर फ्रॉम टायर २/३ सिटीज' अवॉर्ड, राजस्थ-ानचे डॉ.मुकेश कल्ला यांना 'लीडरशिप' अवॉर्ड, चंडीगड येथील डॉ.जयंत सामंता यांना 'इम्पॅक्टफुल पब्लिकेशन' अवॉर्ड, महाराष्ट्राचे डॉ.अमोल बापये आणि तेलंगणा येथील डॉ.मोहन रामचंदानी यांना 'टेक्निकल स्कील' अवॉर्ड आणि महाराष्ट्राचे डॉ. प्रवीण सूर्यवंशी यांना 'इंडोस्कोपी फॉर सर्जन' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# विदर्भात उष्णतेची लाट येणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चंद्रपूर : विदर्भाला उन्हाच्या तीव्र झळा बसू लागल्या आहेत. उष्णता आणि उकाडा मोठ्या प्रमाणानात वाढला आहे. दोन दिवस ढगाळ वातावरण होते. त्यामुळे उकाड्यापासून सुटका होईल असे वाटत असतानाच आज तापमानाचा पारा वाढला. विदर्भात सर्वाधिक तापमानाची नोंद नागपूरची झाली आहे. त्यापाठोपाठ अकोला चंद्रपूर आणि वर्धा शहराचे तापमान होते. खरंतर विदर्भासाठी उन्हाळा नेहमीच तापदायक ठरतो. सूर्य अक्षरश: येथे आग ओकीत असल्याचा भास होतो. दुपारच्या सुमारास घराच्या बाहेर जाणे जीवावर येते. मागील आठवडाभर ४०ओ ते त्यापेक्षा अधिक तापमान हो-ते. आज (शनिवारी) तापमानाने उच्चांक गाठला आहे. तापमान ४४ अंशाचा वर गेले. विदर्भात सर्वाधिक तापमानाची नोंद नागपूरची झाली आहे. नागपूरचे तापमान ४४.७ अंशावर पोहोचले. तर अकोल्याचे ४४.३ अंश, वर्ध्याचे तापमान ४४ अंश होते. वाढलेल्या तापमानामुळे नागरिकांचे मोठे हाल होत आहेत. प्रशासनाकडून काळजी घेण्याचे आवाहन केले जात आहे. तर २१, २२, २३ तारखेला विदर्भात उष्णतेची लाट असेल, असे प्रा. सुरेश चोपणे यांनी सांगितले. त्यामुळे सध्या तरी उकाड्यापासून विदर्भाची सुटका नाही, अशी स्थिती निर्माण झाली आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातही सध्या तापमानाचा पारा वाढला असून ४० अंश सेल्सियस पुढे तापमान गेले आहे. यामुळे जिल्ह्यात नागरिकांच्या आरोग्यावर उष्माघा-ताचा प्रकोप होऊ नये, याकरीता खा-सदार धानोरकर यांनी प्रशासनाला सु-चना केल्या आहेत. विद्यार्थ्यांचे आरोग्य लक्षात घेता इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु असलेल्या शाळांना तात्काळ उन्हाळी सुट्ट्या द्याव्यात. तसेच, शहरातील व तालुक्यातील प्रमुख रस्त्यांवर प्रशासनाच्या माध्यमातून पाणपोईची व्यवस्था करण्यात यावी, अशा सूचना देण्यात आल्या आ-हेत. चंद्रपूर शहरातील मुख्य रस्त्यांवर पाण्याची फवारणी करण्यासंदर्भात खा-सदार प्रतिभा धानोरकर यांनी प्रशासनाला सुचना केल्या आहेत. चंद्रपूर जिल्हा हा प्रामुख्याने मे महिन्यात जगात सर्वात उष्ण राहत असल्याने खासदार धानोरकर यांनी या सुचना केल्याचे सांगितले.

# बनावट पनीर विक्रेत्यांवर आता एफडीएची नजर; ग्राहकांची फसवणूक करणाऱ्यांचे परवाने रद्द होणार : अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बनावट पनीर किंवा चीज ॲनालॉग वापरणाऱ्यांवर अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत कडक कारवाई करण्यात येत आहे. पनीरसारख्या बनावट पदार्थाची विक्री केल्याचे आढळून आल्यास अशा व्यावसायिकांचे परवाने रद्द करण्यात येतील, असा इशारा अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिला आहे.

मंत्री श्री. झिरवाळ यांनी सांगितले, पनीर हा खाद्यपद-ार्थामधील आवडता पदार्थ असून त्याला बाजारात मोठी मागणी असते. विशेषतः लहान मुलांमध्ये पनीरची क्रेझ अधिक आहे. मात्र काही ठिकाणी बनावट पनीर अथवा 'चीज ॲनालॉग' वापरून ग्राहकांची फसवणूक केली जात असल्याचे अन्न व औषध प्रशासन विभागाच्या तप-ासणीत आढळून येते. अशा प्रकारे ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या पनीर विक्रेत्यांवर अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६, तसेच २०११ आणि २०२२ मधील नियमानुसार ही कारवाई केली जाईल.

अन्न सुरक्षा आणि मानके (लेबलिंग व डिस्प्ले नियमन) २०२० च्या नियमांनुसार, विक्री होणाऱ्या अन्नपदार्थातील सर्व घटक व पो-षणमूल्यांची माहिती ग्राहकांसमोर मांडणे बंधनकारक आहे. रेस्टॉरंट, हॉटेल, कॅटरर्स आणि फास्ट फूड विक्रेत्यांना आपल्या मेनू कार्ड्स, डिस्प्ले बोर्ड्स आणि ऑर्डर मशी-नवर अचूक माहिती देणे अनिवार्य आहे.

अन्न व औषध प्रशासन विभाग ग्राहकांच्या हितासाठी कटिबद्ध आहे. अन्नाच्या गुणवत्तेशी कोणत्याही प्रकारची तडजोड केली जाणार नाही.



रेस्टॉरंट, हॉटेल व फास्ट फूड व्यावसायिकांकडून ग्राहकांची फसवणूक होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ च्या कलम १८ (२)(e) नुसार, ग्राहकांना अन्नपदार्थातील घटकांची माहिती देणे बंधनकारक आहे. तसेच, अन्न सुरक्षा व मानके (लेबलिंग आणि डिस्प्ले) नियमन २०२० च्या प्रकरण ३ मधील नियमन ९ (६) नुसार, अन्न व्यावसायिकांनी अन्नपदार्थांची विक्री करताना पोषण संबंधित माहिती आणि त्यातील घटकांची माहिती, तसेच आरोग्य संदेश प्रदर्शित करणे आवश्यक आहे.

अन्न व औषध प्रशासन सर्व अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील चीज ॲनालॉग वितरकांचे खरेदी-विक्री बिले तपासण्याचे निर्देश दिले आ-हेत. तसेच, हॉटेल, रेस्टॉरंट, फास्ट फूड विक्रेते आणि केटरर्स यांची खरेदी बिले तपासून, पनीरच्या ऐवजी ॲनालॉगचा वापर करून ग्राहकांची फसवणूक केल्यास, किमान १० आस्थापनांची सखोल तपासणी करून अन्न नमुने घेऊन घाडी-जप्तीची कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६, नियम व नियमन २०११ तसेच अन्न सुरक्षा व मानके (अन्न व्यवसायिक पर-वाना व नोंदणी) नियमन २०११ मधील तरतुदींनुसार तात्काळ पर-वाना निलंबनाची कार्यवाही केली जाईल. विभागीय सह आयुक्त (अन्न) आणि सहा आयुक्त (अन्न) यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील हॉटेल असोसिएशनच्या कार्यशाळा घेऊन, पनीरच्या ऐवजी चीज ॲनालॉगचा वापर करत असल्यास, त्याबाबत मेनू कार्डमध्ये उल्लेख करण्याबाबत तसेच कायद्यातील तरतुदींबाबत अवगत करावे. यासोबतच, ग्राहकांमध्ये याबाबत जनजागृती करावी.

ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या फसवणुकीला माफ केले जाणार नसून अन्न व्यावसायिकांनी नियमांचे पालन करून ग्राहकांना अचूक माहिती देणे आवश्यक आहे.

**रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाचा दुसरा वर्धापन दिन संपन्न**

**राज्यपाल श्री. सी. पी. राधाकृष्ण यांचे प्रतिपादन**

# राज्याचा कौशल्य विकास विभागाचे काळाची गरज ओळखून मार्गक्रमण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : काळाची गरज ओळखून रतन टाटा महाराष्ट्र कौशल्य विद्या-पीठ विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करून जगभरात भारतीय कुशल मनुष्यबळ पुरवत आहे, ही आनंदाची बाब आहे असल्याचे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले. रतन टाटा महाराष्ट्र कौशल्य विद्यापीठाच्या दुसऱ्या वर्धापन दिनाच्या समारोप कार्यक्रमात राज्यपाल राधाकृष्णन विद्यार्थ्यांना संबोधित करत होते.



एल्फिन्स्टन टेक्निकल हायस्कूल येथे रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाचा दुसऱ्या वर्धापन दिनाचा समारोप कार्यक्रम पार पडला यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन होते. त्यावेळी ते बोलत होते. विद्यापीठाच्या वर्धापन दिन समारोपात कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, विभागाच्या अप्पर मुख्य सचिव मनीषा वर्मा, महाराष्ट्र राज्य रतन टाटा कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, एआयसीटीईचे अध्यक्ष डॉ. टी. जी. सिताराम, राज्यपालांचे सचिव डॉ.प्रशांत नारनवरे, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालिका माधवी सरदेशमुख, कौशल्य विभाग आयुक्त नितीन पाटील उपस्थित होते.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन पुढे म्हणाले की, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाने AI तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, वाणिज्य आणि मीडिया या क्षेत्रात कौशल्य शिक्षण आणि प्रशिक्षणाचा प्रारंभ केला आहे, हे अतिशय आनंददायक आणि उल्लेखनीय आहे. बदलत्या काळात आपल्या पारंपरिक कौशल्याच्या पलीकडे जाऊन आपण नवी पिढी घडवली पाहिजे, त्यासाठी आपल्या शिक्षकांनीही नवी संकल्पना समजून घेऊन त्याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना द्यायला हवे. रतन टाटा महाराष्ट्र कौशल्य विभागाच्या कुलगुरू श्रीमती अपूर्वा पालकर या दृष्टिकोनातून योगदान देत असल्याबाबत त्यांचेही अभिनंदन करतो असेही, राज्यपाल राधाकृष्णन यांनी यावेळी नमूद केले.

आदरणीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी २०४७ पर्यंत भारताला 'विकसित राष्ट्र' निर्माण करण्याचा संकल्प केला आहे. विकसित राष्ट्र निर्माण करण्याच्या दृष्टीने त्यांनी सुरू केलेला 'स्किल इंडिया ' हा उपक्रम या संकल्पात महत्वाचा भाग आहे. जागतिक कौशल्य आत्मसात करताना परदेशी भाषा शिक्षण अतिशय महत्वाचे आहे. राज्याच्या कौशल्य विभागाने जर्मन भाषा विद्यार्थ्यांना शिकवून मनुष्यबळ पुरवण्याचा अतिशय योग्य निर्णय घेतला असल्याचेही राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी एखादी तरी जागतिक भाषा शिकावी, असे आ-वाहनही यावेळी राज्यपालांनी केले. जगात आवश्यक असलेले मनुष्यबळ पुरवण्यासाठी आपल्या महाराष्ट्रात मोठा वाव असल्याचेही ते म्हणाले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) कौशल्य, भारतीय मूल्ये आणि एकात्मिक शैक्षणिक प्रणालीवर भर देत आहे. मुख्य प्रवाहातील शिक्षणामध्ये कौशल्याधारित शिक्षणाचा समावेश केल्याने जागतिक स्तरावर रोजग-ाराभिमुख संधी उपलब्ध होऊ शकते. यासंदर्भात रतन महाराष्ट्र विद्यापीठाने आधीच आर्टिफिशियल इंटेलिजन्स( AI ), रिअल इस्टेट, सेवा क्षेत्र, आणि औद्योगिक व्यवस्थापनात हजारो विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यास प्रारंभ केला आहे, ही अतिशय जमेची बाजू असल्याचे राज्यपाल राधाकृष्णन म्हणाले. कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले की,राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन हे आमचे ऊर्जास्रोत असल्याचे सांगितले. त्यांच्या सहकार्याने विद्या-पीठ नव्या उंचीवर जाणार असल्याचेही मंत्री श्री. लोढा म्हणाले.

रतन टाटा महाराष्ट्र कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू श्रीमती अपूर्वा पालकर यांनी यावेळी विद्यापीठात सुरू असलेल्या कोर्सेसची तसेच मुंबई, नवी मुंबई, पुणे आणि नागपूर केंद्रात सुरु असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. या विद्यापीठात शिक्षित झालेला स्ना-तक जगाच्या कानाकोपऱ्यात आपले भवितव्य घडवायची क्षमता ठेवतो. राज्यशासनाच्या वतीने लवकरच अद्ययावत सुविधांसह पनवेल इथे विद्यापीठाची भव्य वास्तू उभारण्यात येणार असल्याची माहितीही कुलगुरू डॉ. पालकर यांनी यावेळी दिली.

राज्यातल्या युवकांना जर्मनीत काम करण्याची संधी कौशल्य विभागाने मिळवून दिली असून विविध स्तरावर यावर उपक्रम राबवण्यात येत असल्याचे कौशल्य विभागाच्या अप्पर मुख्य सचिव, आयुक्त श्रीमती मनीषा वर्मा यांनी स्पष्ट केले. रतन टाटा महाराष्ट्र विद्यापीठात थिअरी बरोबरच प्रशिक्षणावर अधिक भर दिला जात आहे. त्यामुळे अनेक उद्योगक्षेत्राकडून या विद्यापीठातील विद्यार्थ्यांना मोठी मागणी निर्माण होणार आहे. परदे-शी कंपन्यांसोबत कराराच्या प्रक्रिया पूर्णत्वाला जात असून हे विद्या-पीठ जगात एक ब्रँड म्हणून नाव-ाजले जाईल, असा विश्वास वर्मा यांनी यावेळी व्यक्त केला.

विद्यापीठाच्या वर्धापन दिनाच्या सांगता समारंभात राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचाही सन्मान करण्यात आला. आदर्श प्राध्यापक संदीप जैन, आदर्श युवा प्राध्यापक अनिरुद्ध चव्हाण, प्रशासकीय उल्लेखनीय कार्य मीना श्रीमाळी, ग्रंथपाल मीनाक्षी पाटील तर संत गाडगेबाबा स्वच्छ भारत कौशल्य प्रबोधिनीचे पारितोषिक दीप्ती जाधव यांना देण्यात आले. उत्कृष्ट स्टार्ट अप गटात एक लाख रुपयांचे पारितोषिक वैष्णवी कोठावडे यांना दुसरे दोन लाखांचे पारितोषिक साक्षी पारेख यांना तर तीन लाखांचे पाहिले पारितोषिक विष्णुदास विश्वकर्मा यांना राज्यपालांचे हस्ते देण्यात आले.

# इंग्रजी शाळेची क्रेझ, गुणवत्ता आणि भविष्य



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिक्षणाने माणूस जागृत होतो हे फक्त पुस्तकात वाचायलाच छान वाटतं. वास्तवात शिकलेले लोक जागृत आहेतच असे दिसुन येत नाही. जागृती या विषयावर लिहायचेच झाले तर खुप गहन विषय आहे. परंतु एकाच उदाहरणाने आपण समजून घेऊ आज सुशिक्षित व नोकरदार वर्ग किती जागृत आहे. संविधान कलम क्रमांक २१ जे मुलभूत अधिकारात येते त्यानुसार वय ६ वर्षे ते १४ वर्षे पर्यंत प्राथमिक शिक्षण हे मोफत व सक्तीचे आहे. आणि ते सरकारला द्यावेच वागते. असे असतानाही आपण बघितले तर सुशिक्षित लोक, नोकरदार लोक आपले मुलं खाजगी शाळेत हजारो रुपये फि भरून टाकतात. जेथे शिक्षणाची मोफत व सक्तीची तरतूद असताना पुर्वप्राथमिक अर्थात बालवाडीचे शिक्षणही हजारो रूपये देऊन आज लोक घेत आहेत. सुशिक्षित आणि नोकरदार वर्ग आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत टाकत असल्याने कमी शिकलेले आणि गरिब लोक सुद्धां आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत टाकत आहेत. याचे कारण आहे नोकरदार, श्रीमंत व सुशिक्षित लोक जर इंग्रजी शाळेत मुलांना टाकतात त्यांचेच अनुकरण अल्पशिक्षित व गरिब पालकवर्गही करतात आणि आर्थिक कुवत नसताना देखील ते केवळ मोठेपणा साठी आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत टाकतात. इंग्रजी शाळेत टाकायला थोडाही विरोध नाही पण शासकीय शाळेत, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका येथे सुद्धां इंग्रजी माध्यमातून शिकवण्यात येते तरीही लोक खाजगी शाळेकडे वळले कारण इंग्रजी खाजगी शाळेचा क्रेझ निर्माण झाला. शिकलेल्या व श्रीमंत लोकांची मुलं शाळेत जाऊ शकतात तर आपण कुठे कमी आहोत या अविर्भावात गरिबही मोफत असलेले शिक्षण विकत घेतो हि शोकांतिका आहे. इंग्रजी शाळेत टाकलेल्या विद्यार्थ्यांना खरंच इंग्रजी बोलता येते का? याचा विचार कधी केला का? जेथे हजारो, लाखों रुपये आपण इंग्रजी शाळेवर खर्च करत आहोत. एवढा खर्च करूनही मुलं इंग्रजी बोलु शकत नसतील तर एवढा खर्च करून नेमका काय फायदा? शेतखऱ्यांचा दहा विस रुपयांचा भाजीपाला घेताना भाव करणारे लोक लाखों रुपयाचा चुराडा करत असतील त्यातून काहीच साध्य होत नसेल तर खर्च कशासाठी? श्रीमंतांना, नोकरदारांना हे परवडणारही परंतु गरीबांचे काय? मेहनत करून, वेळप्रसंगी व्याजाने, घरातील काही वस्तु विकुन शाळेची फि भरायची आणि मुलांना इंग्रजी बोलताही येत नसेल तर इंग्रजी शाळेत टाकण्याचा उद्देश साध्य झाला का? यावर मात्र कोणीही चर्चा वा विचार करायला तयार नाही. हे खुप भंयकर आहे. लाखों चा रूपये खर्चून जर गुणवत्ता मिळत नसेल तर स्वतः



**विनोद पंजाबराव सदावर्ते**
(समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००)


च्या खर्चाने स्वतः च्या मुलांच्या जिवनात अंधार करण्यात कोणते शहाणपण आहे? बरेच पालक लेकराचे कौतुक करताना म्हणतात आमच्या लेकराला इंग्रजी शाळेत टाकले तर त्याला मराठी मधून काहीच समजत नाही. सर्व इंग्रजी मधुनच पाहिजे. अर्थात असे बोलणे हेच लेकराच्या उधोगतीचे कारण आहे. कारण घरात आपण मराठी बोलतो. आणि लेकराला मराठी येत नसेल तर पालक व मुलं यांचात संवाद कसा होईल? इंग्रजी शाळेत टाकणे म्हणजे मराठीवर दुर्लक्ष करणे आहे का? बरं इंग्रजी शाळेतील लेकरांना खरंच इंग्रजी समजते का? तर याचे उत्तर नाही कारण आम्ही जेव्हा इग्लिश मिडीयम च्या विद्यार्थ्यांना बोलतो, शिकवतो तेव्हा लक्षात येते कि त्यांना फक्त मे आय गो टू वाशरुम, मे आय कम इन, वन, टू, थ्री, प्लस, मायनस, डिवाइड येवढच येते. सात विचारले तर म्हणतात मराठी नाही समजत इंग्रजी मध्ये विचारा. सेव्हन ला मराठी मध्ये काय म्हणतात किंवा डिवाइड, प्लस, मायनस याला मराठीत काय म्हणतात हेच जर कळत नसेल तर खरचं ती.गुणवत्ता आहे का? वन टु बोलणे, किंवा विषयांचे नाव इंग्रजी मध्ये बोलणे म्हणजे इंग्रजी बोलता येते किंवा समजते असे मुळीच नाही. इग्लिश मिडीयम ला जाणाऱ्या मुलांना खरचं इग्लिश बोलता येते का हे तपासायचे तर दोन मिनिटे चार मिनिटे इंग्रजी मध्ये बोलता आले पाहिजे. आणि पुस्तकातील कविताच नाही तर दैनंदिन व्यवहारातील संभाषण करता आले पाहिजे तर इग्लिश मिडीयमला टाकून फायदा होईल. इंग्रजी माध्यमातून शिकणाऱ्या बऱ्याच विद्यार्थ्यांच्या पालकांना इग्लिश बोलता येत नाही. त्यांनाच बोलता येत नाही तर ते आपल्या मुलाला इग्लिश जमते कि नाही याची पडताळणी कशी करणार? फक्त पुस्तकातील पाहून लिहणे म्हणजे पाल्य हुशार आहे असा अर्थ होतो का? म्हणून पालकांची सुद्धां जबाबदारी आहे. जर आपला मुलगा मुलगी इग्लिश शाळेत सातवी पर्यंत आहे किंवा आपण इग्लिश शाळेत टाकणार आहात तर अगोदर पालकांनी इग्लिश बोलायला शिकले पाहिजे. पालकांनी इग्लिश बोलायला शिकली तर मुलांना आपोआपच येईल. आणि मुलांना इग्लिश बोलता आले म्हणजे आपले लाखो रुपयांची बचत झालीच म्हणून समजा. पण पालकांना इग्लिश येत नाही आणि मुल महागड्या इग्लिश शाळेत जात असतील तर पैशा व्यर्थ जाण्याची शक्यता जास्त असते. याचा अर्थ ज्या पालकांना इग्लिश येत नाही त्यांनी आपली मुल इग्लिश शाळेत शिकवायचीच नाही का? तर नक्कीच शिकवायची परंतु हजारों लाखो रुपये खर्च करण्याची गरज नाही. जिल्हा परिषद शाळेतही इंग्रजी माध्यम आहे. तेथे शिकवू शकता आणि फार फार तर कमी खर्चात खाजगी शिकवणी लाऊन मुलांना इंग्रजी बोलायला शिकवू शकता. पण खाजगी शाळेत भरभक्कम फि भरून ही जर खाजगी शिकवणी लावावी लागत असेल तर आपण नेमका शाळेत पैसा भरतो कशाचा यावरही विचार विनिमय होणे आवश्यक आहे. आज स्वतःला जागतिक पातळीवर सिद्ध करायचे असेल तर इंग्रजी आवश्यक आहेच. आज अनेक नोकऱ्या देखील इग्लिश बोलण्यावरच आहेत. परंतु फक्त इग्लिश बोलण्यासाठी बालवाडीपासुन ते पदवी पर्यंत लाखों रूपये खर्च करण्याची काहीच गरज नाही. बरं एवढा खर्च करूनही जे इग्लिश शाळेत जातात त्यांना किती इग्लिश येते हे तपासून बघितलं तर गुणवत्ता ढासाळत चालली आहे हे दिसून येते. व्हाट इज युवर नेम? वाट इज युवर फादर नेम? व्हाट इज युवर फुल नेम? हे तर मराठी शाळेतील पहिली दुसरीची विद्यार्थी बोलू शकतात. मग इंग्रजी शाळेत जाऊन नेमकं काय शिकले याचे उत्तर शोधणे गरजेचे आहे. कारण आज याचे उत्तर नाही शोधले तर या मुलांचे भविष्य अंधकार मय होणार आहे. लाखों रुपये खर्च करून इग्लिश जर बोलता आले नाही, आपण शिकलेले इग्लिश मध्ये मांडता आले नाही तर नोकरी कुठे लागणार? शासकीय नोकरी कमी झाल्या आहेत पण शासकीय नोकरी साठी इग्लिश माध्यमाची सक्ती नाही. खाजगी कंपन्या मध्ये रोजगार संधी आहे तर ते इग्लिश बोलता आले तरच नोकरी देतात. आणि इग्लिश माध्यमातून शिकले म्हणल्यावर इग्लिश तर यायलाच पाहिजे. जर इंग्रजी येत नसेल मराठी जमत नसेल तर अशांना रोजगार कोण देईल? बरं रोजगार मिळवण्यासाठी इग्लिश बोलता यायला पाहिजे तर बालवाडीपासुन इंग्रजी चा आग्रह का? कोणत्याही चांगल्या इग्लिश टिचर कडून चार पाच महिन्यात चांगली इग्लिश बोलणे शिकता येते तेही प्रत्येकाला परवडेल अशा किंमतीत. मग फक्त दरवर्षी निरर्थक खर्च कशासाठी? बरं एवढा खर्च करूनही नोकरी किंवा रोजगाराची शंभर टक्के शाश्वती आहे का? खर्च करूनही शाश्वती नसेल तर महाग शिक्षण कशाला मग? खाजगी महाग शिक्षणावरचा खर्च टाळून सरकारने शिक्षण द्यावे यासाठी आग्रह धरला आणि पदवी पर्यंत चे खाजगी शिक्षणावरील पैसे बचत केले तर समजा शिकून नोकरी नाहीच लागली तर बचत झालेल्या पैशात छोटा मोठा उद्योग सुरू करून उपजिवीकेचे साधन उपलब्ध करून घेता येईल. परंतु संपूर्ण बचत खाजगी शिक्षणावरच खर्च केली आणि शिक्षण पुर्ण झाल्यावर नोकरी नाहीच मिळाली तर भविष्य मात्र अंधारात जाईल आणि याला जबाबदार कोण राहील याचा विचार व्हावा. म्हणून केवळ रोजगार पाहिजे म्हणून इग्लिश बोलता यायला पाहिजे असल्यास इग्लिश स्पोकन कोर्स करूनही इग्लिश बोलता येते. ज्यांची मुलं खरचं सातवी पर्यंत आहेत किंवा लहान मुल आहेत ज्यांना शाळेत टाकायचे आहे अशा मुलांच्या आई वडिलांपैकी एकाने जरी इग्लिश बोलणे शिकले तर मुलाचे भविष्य उज्वल होईल. कारण इग्लिश घरातच असल्याने त्याला बोलायला जास्त मेहनत घेण्याची गरज नाही. आणि इग्लिश बोलायला शिकणे काही अवघड गोष्ट नाही. म्हणून प्रत्येक विद्यार्थी पालक यांनी विचार करूनच आपल्या खर्चाचे नियोजन करून बचत करावी. आजची बचत उद्याची कमाई असते. खाजगी शाळेला खुप मोठी रक्कम देऊन श्रीमंत केल्यापेक्षा तोच पैसा बचत करून लेकराच्या भविष्यासाठी ठेवला तर खुप मोठा आधार होईल. म्हणून मोठेपणा न करता वास्तव समजून शिक्षणाला महत्व द्यायला पाहिजे. फक्त उधळपट्टी म्हणजे शिक्षण मुळीच नाही. प्रत्येकाने इग्लिश शिकणे काळाची गरज आहे. त्यासाठी इग्लिश स्पोकन कोर्स चा आधार घेणे हाच सर्वोत्तम उपाय आहे.

## ठाकरे बंधू एकत्र आले तर आम्हाला आनंदच : फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्राच्या राजकारणात दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या चर्चा रंगल्या होत्या. यावर आता राज ठाकरेंनी शिवसेना ठाकरे गटाशी हातमिळवणी करण्यासाठी पहिली साद घातली आहे. यावर उद्धव ठाकरेंनीही सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. 'मी सोबत येण्यास तयार आहे, माझ्याकडून सगळी भांडणं मिटली,' असे ठाकरेंनी म्हटले आहे. यानंतर दोन्ही ठाकरे बंधूंचे मनोमिलन होण्याच्या चर्चांनी आता जोर धरला आहे. यावर आता राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. यातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनीही प्रतिक्रिया दिली आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'बघा जर दोघेही एकत्र आले तर आम्हाला आनंदच आहे. कोणीही आपल्यातील मतभेद विसरून एकत्र येत असतील तर यात वाईट वाटायचे कारण नाही. फक्त मला वाटतं की, माध्यमं त्यावर जास्त विचार करत आहेत. त्यामुळे वाट बघा. ते एकत्र आले तर उत्तम आहे. आम्ही स्वागत करू,' असेही फडणवीसांनी स्पष्ट केले.



दरम्यान एकनाथ शिंदे मनसे-शिवसेना ठाकरे गटाच्या संभाव्य युतीवर मात्र संतापल्याचे पाहायला मिळाले. ते सध्या साताऱ्यातील आपल्या मूळगावी आहेत. येथे त्यांना युतीबाबत प्रश्न विचारला असता, त्यांनी काय रे तू म्हणत एका खाजगी वृत्तवाहिनीच्या पत्रकाराचा माईक दूर केल्याचे पाहायला मिळाले. तेथून उत्तर न देताच निघून गेले.

मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी दिग्दर्शक महेश मांजरेकर यांना दिलेल्या मुलाखतीत दोन्ही ठाकरे बंधूच्या एकत्र येण्यावर प्रश्न विचारण्यात आला. प्रत्युत्तरात राज ठाकरेंनी, 'आमच्यातली भांडणं छोटी आहेत, महाराष्ट्र मात्र मोठा आहे.' असे म्हणत युतीसाठी साद घातल्याचे दिसते. यावर उद्धव ठाकरेंनीही कामगार सेनेच्या कार्यक्रमातून सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. 'माझ्याकडून सगळी भांडणं मिटली. पण माझी एक अट आहे. माझ्यासोबत येऊन हित आहे की, भाजपसोबत जाऊन हित आहे, ते आधी ठरवा,' असे ठाकरे म्हणाले. तर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊतांनीही एकत्र येण्याचे आवाहन केले. शिवसेना ठाकरे गटाच्या अधिकृत एक्स हँडलवर देखील दोन्ही भावांचा हस्तांदोलन करतानाचा एकत्र फोटो शेअर करत युतीचे स्पष्ट संकेत देण्यात आले आहेत.

## 'तर मराठी माणसासाठी हा सुवर्णक्षण, ठाकरे नाही, सर्वच कुटुंबांनी एकत्र यावं', रोहित पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या एकत्र येण्याच्या चर्चांना वेग आला आहे. आगामी काळात मुंबई महापालिकेची निवडणूक होणार आहे. या निवडणुकीत विजय मिळावा यासाठी भाजपकडून सर्वोतोपरी प्रयत्न केला जातोय. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना देखील तितक्याच ताकदीने मुंबईत काम करत आहे. मुंबईत ठाकरे गटाच्या अनेक दिग्गज माजी नगरसेवकांनी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. याशिवाय केंद्रात आणि राज्यात भाजपचं सरकार आहे. तसेच एकनाथ शिंदे आणि भाजपकडून राज ठाकरे यांना सोबत घेण्याचे प्रयत्न सुरु आहेत. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्यासमोर मुंबई महापालिकेत मोठं आव्हान उभं राहणार आहे. याबाबतच्या विविध घडामोडी घडत असताना दोन्ही ठाकरे बंधूंनी एकत्र येण्यास तयारी दर्शवली आहे. पण उद्धव ठाकरेंनी राज ठाकरेंसाठी काही अटी ठेवल्या आहेत.

उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरे यांच्यासाठी ठेवलेल्या अटी पाहता दोन्ही नेत्यांमध्ये युती होणं फारसं कठीण वाटत आहे. कारण राज ठाकरे यांनी कुणाला भेटावं किंवा भेटू नये हा त्यांचा वैयक्तिक विषय असल्याचं मनसे नेत्यांनी म्हटलं आहे. पण तरीही दोन्ही ठाकरे बंधूंनी केलेली वक्तव्य महत्त्वाची आहेत. महाराष्ट्राच्या हितासाठी आपण भांडण बाजूला सारुन एकत्र येण्यास तयार असल्याचं राज ठाकरेंनी म्हटलं आहे. तर उद्धव ठाकरेंनी भांडण मिटतील, पण शिंदे गट आणि भाजपच्या नेत्यांसोबतचे राजकीय संबंध तोडायचे, अशी अट घातली आहे. तर दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याच्या मुद्द्यावर सूचक ट्विट केलं आहे.

रोहित पवार यांनी आपल्या अधिकृत 'एक्स' अकाउंटवर याबाबत भूमिका मांडली आहे. मराठी अस्मितेला नख लावू पाहणाऱ्या महाराष्ट्रद्रोही शक्तीच्या विरोधात ठाकरे कुटुंब एकत्र येत असेल तर मराठी मनासाठी हा सुवर्णक्षण असेल, असं रोहित पवार म्हणाले आहेत.

दरम्यान मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे दोन्ही बंधू एकत्र येण्याच्या तयारीत आहेत. दोन्ही नेत्यांकडून तशी वक्तव्ये करण्यात आली आहेत. त्यामुळे राजकीय वर्तुळात याचबाबत चर्चा सुरु आहेत. ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या वृत्तावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आनंद व्यक्त केला आहे. राज ठाकरे म्हणाले की, आमच्यापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे ही त्यांची लाईन आहे. माझ्यासाठी ही अतिशय गोड आणि आनंदाची बातमी आहे, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या.

**छत्रपती संभाजीनगर येथील महाराणा प्रतापसिंह यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे लोकार्पण**

**महाराणा प्रतापसिंह यांचा पुतळा प्रेरणा व शौर्याचे प्रतिक - केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह**

# महाराणा प्रतापसिंह यांचा पुतळा प्रेरणास्थान : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर (विमाका) : महाराणा प्रतापसिंह एक राष्ट्रभक्त होते ते शेवटपर्यंत देशासाठी लढत राहिले. छत्रपती संभाजीनगर येथे उभारण्यात आलेला त्यांचा पुतळा आपल्या सर्वांसाठी प्रेरणास्थान आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



महाराणा प्रतापसिंह यांचा इतिहास अतिशय गौरवशाली आहे. देशाच्या संरक्षणासाठी त्यांनी प्रदिर्घ संघर्ष केला. त्यामुळे ते भारताचे जननायक म्हणून मानले जातात, छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा उभारण्यात आलेला पुतळा आजच्या पिढीसाठी प्रेरणास्त्रोत आहे, खऱ्या अर्थाने महाराणा प्रतापसिंह यांचा पुतळा प्रेरणा व शौर्याचे प्रतिक आहे, असे मत केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी व्यक्त केले.

छत्रपती संभाजीनगर येथील महानगरपालिकेच्या कॅनॉट गार्डन येथे आज महाराणा प्रतापसिंह यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाले, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, पालकमंत्री संजय शिरसाट, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, पणन मंत्री जयकुमार रावल, विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, खा. डॉ. भागवत कराड, खा. संदीपान भुमरे, आ. प्रदीप जैस्वाल, आ. नारायण कुचे, आ. अनुराधा चव्हाण, आ. संजय केनेकर, महाराणा प्रतापसिंह यांचे वंशज लक्ष्यराज सिंह यांच्यासह महानगरपालिका आयुक्त जी. श्रीकांत उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांचा अश्वारूढ पुतळा हा छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या माध्यमातून उभारण्यात आला आणि भारताचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी त्याचे अनावरण केले, याचा आनंद आहे. छत्रपती संभाजीनगर शहरात एकीकडे छत्रपती शिवाजी महाराज आणि दुसरीकडे वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांचा पुतळा आहे. त्यामुळे प्रेरणेची कमतरता या ठिकाणी असणार नाही. महाराणा प्रतापसिंह एक राष्ट्रभक्त, देशभक्त होते, ते शेवटपर्यंत देशासाठी लढत राहिले. स्वराज्यासाठी महाराणा प्रतापसिंह, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांनी आपल्या जीवनाचे बलिदान दिले पण मोगलांचे कधीही मांडलिकत्व स्वीकारले नाही. आज आपण खऱ्या अर्थाने या वीरपुरूषांमुळेच स्वातंत्र्य उपभोगत आहोत. या ठिकाणी असलेला महाराणा प्रतापसिंह यांचा पुतळा केवळ पुतळा नाही तर एक प्रेरणास्त्रोत आहे. या वीर पुरूषांच्या प्रेरणास्त्रोताच्या माध्यमातूनच स्वतंत्र भारताला विकसित भारताकडे नेण्याचा संकल्प देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केला जात आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाची मानके, देशाच्या समृद्ध वारसाला पुनर्रचित करण्याचे काम सुरू आहे. अशा या पर्वामध्ये छत्रपती संभाजीनगरमध्ये पुन्हा एकदा आम्हाला प्रेरणा देण्यासाठी महाराणा प्रतापसिंह पुतळयाच्या माध्यमातून विराजमान झाले आहेत. मी खरोखर संभाजीनगरकरांचे मनापासून अभिनंदन करतो. वीर पुरूषांच्या मार्गाने चालण्याचा निर्धार आपण करूयात, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह म्हणाले की, महाराणा प्रतापसिंह यांच्या पुतळ्याचे अनावरण माझ्या हस्ते झाले याचा मला मनस्वी आनंद आहे. हा पुतळा प्रेरणा, आदर्श, साहस यांचे खरे प्रतिक आहे. महाराणा प्रतापसिंह हे देशाचे जननायक आहेत, त्यांची प्रेरणा आजच्या पिढीने घेण्याची गरज आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महाराणा प्रतापसिंह यांचा खरा इतिहासही आजच्या पिढीने जाणून घ्यावा. या महापुरूषांनी कधीही भेदभाव केला नाही, त्यांनी कायम जनहितासाठी कार्य केले. देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात हे महापुरूष स्वातंत्र्य विरांचे प्रेरणास्थान राहीले आहेत, असा उल्लेख त्यांनी केला.

महाराणा प्रतापसिंह यांनी समाजाला संघटीत करण्याचे मोठे काम केले. सर्व समाज घटकांनी त्यांना साथ दिली असून त्यांचे कार्य कायम प्रेरणादायी ठरणारे आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये उभारलेला त्यांचा पुतळा आपल्याला कायम शौर्याची व त्यांच्या विरतेची प्रेरणा देत राहील, नव्या पिढींने त्यांचा आदर्श समोर ठेवत वाटचाल करावी, असे आवाहनही संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी केले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतत्वात आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे नाव आदराने घेतले जात आहे. २०१४ मध्ये ११ व्या क्रमांकावर असलेली देशाची अर्थव्यवस्था आता ५ व्या क्रमांकावर आली आहे. भविष्यात भारत जगातील पहिल्या तीन प्रगत देशात ओळखला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे म्हणाले, महाराणा प्रतापसिंह यांचा इतिहास अतिशय प्रेरणादायी व आदर्शवत आहे. राजस्थान ही त्यांची भूमी विरांची भूमी म्हणून देशात आेळखली जाते. महाराणा प्रतापसिंह यांचा त्याग व परिश्रम हे युवकांसाठी आदर्श आहेत, असे सांगून श्री बागडे यांनी महाराणा प्रतापसिंह यांची कारकिर्द विशद केली.

पालकमंत्री संजय शिरसाट म्हणाले, मी महानगरपालिकेत असताना महाराणा प्रतापसिंह यांच्या पुतळयाबाबतचा ठराव घेण्यात आला. आज अतिशय सुंदर जागेत त्यांचा पुतळा उभारण्यात आल्याने खऱ्या अर्थाने आमचे स्वप्न पुर्ण झाले आहे.

मंत्री अतुल सावे यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी महाराणा प्रतापसिंह यांचा पुतळा उभारण्याबाबतचा प्रवास विशद केला. आभार मनपा आयुक्त जी. श्रीकांत यांनी मानले.

यावेळी नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...



### सांगोला तालुक्यातील ग्रामपंचायत सरपंच पदाचे आरक्षण सोडत तारीख जाहीर

पंढरपूर/प्रतिनिधी : सांगोला तालुक्यातील ग्रामपंचायत सरपंच पदाचे आरक्षण सोडत सांगोला तालुक्यातील २०२५. २०३० या पंचवार्षिक कालावधीसाठी ग्रामपंचायत सरपंच पदाची आरक्षण निश्चित करण्यासाठी दिनांक २२ एप्रिल २०२५ रोजी सकाळी बारा वाजता. पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मृती भवन सांगोला येथे आरक्षण सोडतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

यासोबत कार्यक्रमासाठी तालुक्यातील सर्व इच्छुक व सर्व नागरिकांनी हजर राहावे असे आव्हान सांगोला तालुक्याचे कर्तव्यदक्ष तहसीलदार संतोष कणसे यांनी केले आहे.

### पंढरपुर तालुक्यातील ९५ ग्रामपंचायत सरपंच पदाचे आरक्षण दि.२२ एप्रिलला सोडत

पंढरपूर : पंढरपूर तालुक्यातील सन २०२५-२०३० या पंचवार्षिक कालावधीसाठी ९५ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी दि.२२ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता शेतकी भवन, पंचायत समिती पंढरपूर येथे आरक्षण सोडतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या सोडत कार्यक्रमासाठी तालुक्यातील इच्छुक सर्व नागरिकांनी हजर राहवे असे आवाहन तहसिलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

# भोरच्या संग्राम थोपटेंचा काँग्रेस पक्षाचा राजीनामा: राज्यात काँग्रेसला मोठा धक्का! भाजपमध्ये प्रवेश करणार

## २० एप्रिल रोजी काँग्रेस पदाधिकारी यांची बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राज्यातील काँग्रेसच्या पोटातून एक मोठी बातमी समोर आहे. संग्राम थोपटे यांनी अखेर काँग्रेसला राजीनामा दिला आहे. शिवाय ते लवकरच भाज्यांमध्ये पक्ष प्रवेश करणार असल्याची माहिती पुढे आली आहे करण्याच्या आधी ठोक्यांनी उद्या २० एप्रिल काँग्रेस पदाधिकारी यांची बैठक बोल-ावली असून या बैठकीत ते पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांच्याशी चर्चा करून त्या आपली पुढील घोषणा करणार असल्याची शक्यता आहे या बैठकीला तालुक्यातील सर्व समर्थक उपस्थित राहणार असते की ही चर्चा आहे संग्राम थोपटे हे काँग्रेसचे बडे नेते असून ते तीन वेळा आम दार होते व त्यांचे वडील अनंतराव थोपटे हे सहा वेळा भोर विधानसभेचे आमदार होते त्यामुळे पुण्याच्या राजकीय वर्तुळातील एक बडे नेते असून ते तीन वेळा आमदार होते पण त्यांचे वडील अनंतराव थोपटे हे सहा वेळा भोर विधानसभेचे आमदार होते त्यामुळे पुण्याच्या राजकीय वर्तुळातील एक बडा नेता भाजपच्या वाटेवर असल्याने राज्यात ही काँग्रेसला मोठा धक्का असल्याचे बोलले जात आहे.

भाजपमध्ये प्रवेश करणार उद्या करणार की मन की बात.

काँग्रेसचे कट्टर समर्थक आणि भोर येथील मोठा राजकीय राजकीय घर-ाणे म्हणून थोपटे कुटुंबाकडे बघितले जात त्यातच संग्राम थोपटे हे काँग्रेसचे बडे नेते असून ते तीन वेळा आमदार होते व त्यांचे वडील आनंदराव थोपटे हे सहा वेळा आमदार होते नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये अजित पवार गटाचे राष्ट्रवादी



काँग्रेसचे उमेदवार आणि त्यांचा पराभव केला.

तेव्हापासून ते नाराज असल्याची तेव्हापासून ते पक्षाला रामराम करणार असे चर्चा होती राजकीय वर्तुळात चर्चा होती.




### हॅण्डल लॉक केलेली दुचाकी पळवली

सोलापूर, (प्रतिनिधी) : हॅण्डल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३. डीडी.१६२६ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १५ एप्रिल रोजी सकाळी एमआयडीसी रोड येथे घडली. याप्रकरणी रामकृष्ण राजू चिलबेरी (वय-५३,रा.गांधीनगर झोपडपट्टी नंबर ६) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस नाईक उबाळे हे करीत आहे.

## बालकांच्या अनधिकृत संस्थांवर कठोर कारवाई होणार : आयुक्त नयना गुंडे यांची माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील काही भागांमध्ये बेकायदेशीररित्या सुरू असलेल्या बालगृह, वसतिगृह आणि अनाथाश्रमांविरोधात महिला व बालविकास विभागाने कठोर भूमिका घेतली आहे. अशा अनधिकृत संस्थांवर एक वर्ष कारावास अथवा एक लाख रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षांची कारवाई केली जाणार असल्याची माहिती महिला व बालविकास आयुक्त नयना गुंडे यांनी दिली आहे. अनधिकृतपणे संस्थांमध्ये बालकांना डांबून ठेवणे, त्यांच्यावर शारीरिक, मानसिक आणि लैंगिक शोषणाच्या घटना घडत असल्याचे निदर्शनात आले आहे. ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची असून, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ व सुधारित अधिनियम २०२१ तसेच महाराष्ट्र राज्य बाल न्याय नियम २०१८ च्या तरतुदींचे उल्लंघन आहे. कलम ४२ नुसार, कोणत्याही संस्थेला नोंदणी प्रमाणपत्राशिवाय बालकांची देखभाल करण्याची परवानगी नाही. अशा संस्थांचे संचालन करणाऱ्यांवर एक वर्षाचा कारावास किंवा किमान एक लाख रुपयांचा दंड, किंवा दोन्ही शिक्षेची तरतूद आहे, असे आयुक्त गुंडे यांनी सांगितले.

या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सतर्क राहून आपल्या परिसरात अशी अनधिकृत बालक संस्था आढळल्यास जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अथवा चाईल्ड हेल्पलाईन १०९८ या क्रमांकावर तातडीने संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे. बालकांवरील शोषण रोखण्यासाठी समाजाने सजग राहून प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहनही आयुक्त गुंडे यांनी केले आहे.

# केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज सपत्नीक श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री श्री जाधव यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. महेश सूडके, सांगोला उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.अरविंद गिराम, मंगळवेढ्याचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. जानकर तसेच मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

# पारधी समाजातील सामाजिक कार्यकर्ते पंडीत भोसले जेष्ठ समाज सेवक पुरस्काराने सन्मानित



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : केरूर ता.तुळजापूर येथील पारधी समाजातील सामाजिक कार्यकर्ते तथा आदिवासी पारधी सामाजिक संघटना महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष पंडित बिट्टू भोसले याना क्रांतीवीर चाफेकर स्मारक समिती पिंपरी चिंचवड पुणे यांच्या वतीने महाराष्ट्र राजाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते तर उपमुख्या मंत्री अजित पवार यांच्या प्रमुख्य उपस्थितीत पिं-परी चिंचवड पुणे येथे आयोजित कार्यक्रमात जेष्ठ समाजसेवक या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

पंडित भोसले हे अणदूर ता.तुळजापूर येथील मुळ रहिवासी असून ते सध्या केरूर या गावी वास्तव्यास आहेत.त्यांचा जन्म एका आदिवासी पारधी समाजा-तील सामान्य कुंटुबात झाला असून पारधी समाज हा समाजातील मुळ प्रवाहापासून कोसो मैल दुर असल्याने पंडित भोसले शिक्षणा-पासून वंचित राहीले.वडिला बरोबर बलुते मागत फिरता फिरत त्यांचा संपर्क समाजातील सामाजिक कार्यकर्ते यांच्याशी आला.त्यामुळे त्याना सामाजिक कार्याची आवड निर्माण झाली. दरम्यानच्या काळात मराठवाडयाचे साने गुरुजी म्हणून ओळखले जानारे माजी आमदार शिक्षण महर्षी कै.सि.ना.अलूरे गुरूजी यांच्याशी संपर्क आला. त्यामुळे त्यांच्या विचारात फार म ोठे परिवर्तन झाले.मला शिक्षणाची संधी मिळाली नाही हे माझे दुर्दे व आहे. परंतु पारधी समाजातील पुढची पिढी शिक्षणाच्या प्रवाहात आली पाहिजे, अंधश्रध्देतुन बाहेर पडली पाहीजे समाजाने पारधी समाजाच्या कपाळावर मार-लेला चोरीचा शिक्का पुसल गेला पाहिजे या विचाराने प्रेरित त्यानी सन १९७८ पासून सक्रिय झाले. आपल्या मुला मुलीना शाळेत घातले तसेच पारधी समाजातील इतर मुलाना,मुलीना शिक्षणच्या प्रवाहात आणले आजही त्यांचे ते कार्य अविरत पणे चालू आहे. एवढचं नाहीतर पारधी समाजातील कुइंबाना हक्काचे घरकूल मिळाले पाहीजे, शालेय विद्यार्थ्याना जा-तीचे दाखले मिळाले पाहिजे, पारधी कुटूंबाना रेशन कर्ड मिळले पाहिजे, त्यांची नावे मतदारा यादीत नोंदवली पाहीजे, पारधी समाजातील तरुणाना रोजगार मिळाला पाहीजे,सुशिक्षित तरु-णाना शासकीय नोकरीत सामावून घेतले पाहिजे यासाठी सातत्याने शासनाकडे मोर्चे, आंदोलनाच्या मध्यमातून निवेदन देवून पाठपुरावा करण्याचे काम सातत्याने करत आहेत. त्यांच्या एकूनच कार्याची योग्य ती दखल घेवून पिंपरी चिंचवड पुणे येथिल क्रांतीवीर चाफेकर समितीने पंडीत भोसले यांची जेष्ठ समाजसे-वक पुरस्कारासाठी



निवड केली करून नुकतच पिं-परी चिंचवड पुणे येथे आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या हस्ते पंडित भोसले याना सदर ज्येष्ठ सम ाजसेवक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी महाराष्ट्राचे उच्च तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, पद्मश्री पुरस्कार प्राप्त संपादक गिरीश प्रभुणे,संपादक मा.रम ेश पतंगे,महाद-ेव गायकवाड सर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पंडित भोसले याना सदर पुरस्कार मिळाल्या बादल तुळजापूर तालूक्यातीलच नव्हे तर धाराशिव जिल्ह्यातील मित्र परिवारातून त्यांचे सर्वत्र आभिनंदन केले जात आहे.

**गावांमध्ये रोजचा पाणीपुरवठा पंधरा दीवसआड** — **नागरिक त्रस्त**

# औसा तालुक्यात जलजिवन मिशनचे कामे रखडल्याने ग्रामिण भागात पाणी टंचाईच्या समस्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा/अमर जाधव : सरकारने जलजिवन मिशन योजनेसाठी करोडो रुपये खर्चुनही ग्रामिन भागात भिषण पाणीटंचाई ???

औसा तालुक्यातील ग्रामीण भागात जलजिवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठ्याच्या कामात झालेल्या विलंबामुळे पाणी टंचाईचे गंभीर प्रश्न उभे राहिले आहेत. तालुक्यातील अनेक गावांमध्ये पिण्याचा पाण्याचे पुरवठा अपुरा पडत असल्याने सामान्य नागरिक त्रस्त झाले आ-हेत. जलजीवन मिशन या प्रकल्पाला लागलेल्या अडथळ्यांमुळे ग्रामीण भागा-तील नागरिकांना दररोजच्या पाण्याच्या गरजांसाठी मोठ्या प्रमाणावर संघर्ष करावा लागत आहे. औसा तालुक्यात जलजिवन मिशन अंतर्गत जलस्रोतांची उभारणी व पाणीपुरवठा योजनेचे काम वेळेवर पूर्ण न होण्याच्या कारणाने अनेक गावांमध्ये रोजचा पाणीपुरवठा पंधरा दीवसआड होत असल्याने, पाणीपुरवठा खंडित झाला आहे. स्थानिक प्रशासन व संबंधित विभागात कामकाजाच्या संमिश्रतेमुळे कामे ठप्प पडल्याने, जलस्रोतांच्या उभारणीपर्यंत सर्वच विभागांत कामांचा फटका बसला आहे यामुळे गावातील लोकांना भर उन्हाळ्यात पाण्याचा तुटवडा भासतो आहे व पाण्यामुळे त्यांच्या दैनंदिन कामकाजावर नकारात्मक परिणाम होत आहे.तालुक्यातील अनेक गावकऱ्यांनी सांगितले की, आमच्या गावात पाणी मिळणे फार कठीण झाले आहे. जलजिवन मिशनचा लाभ अजूनपर्यंत आमच्यापर्यंत पोहोचला नाही, अशी नाराजी ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

औसा तालुक्यातील पाणी टंचाईची समस्या केवळ स्थानिकच नाही तर परिसरातील सामाजिक, आर्थिक व पर्यावरणीय स्वास्थ्यासाठी गंभीर आव्ह-ान ठरत असल्याने . जलजिवन मिशन सारख्या महत्वाकांक्षी योजनेच्या कामे



रखडण्यामुळे लांबणीवर पडलेले कामे लवकरात लवकर सुरू करणे आणि पारदर्शकपणे सिंचन विहीर व जलकुंभाचे कामे करणे आवश्यक आहे. यामुळे केवळ पाणीपुरवठा सुकर होणार नाही तर ग्रामीण भागातील ग्रामस्थांचे जीवनमान सुधारण्यासही मदत होईल.

तरी औसा तालुक्यातील रखडलेले जलजिवन मिशनचे कामे लवकरात लवकर पुर्नत्वास नेउन जलजिवन मिशन यौजना प्रभाविपणे राबवण्यात यावी अस ग्रामिन भागातुन बोलल जातय .औसा तालुक्यातील अनेक गावात जलजिवन मिशनचे कामे पुर्ण होउनही लोकांना पाणीपुरवठा होत नसल्याचही चित्र आहे.



# पंढरी नगरीत अनोखी गुरु शिष्यांची जोडी...

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प. श्री ज्ञानेश्वर महाराज जळगावकर समाज-सेवक मुस्लिम युवक मुजरिम कमली वाले त्यांनी चक्क स्वतः च्या रक्ताने काढलेली चित्र त्यांना भेट दिली. सावळ्या विठुरायाच्या चरणापाशी हा सोहळा पार पडला हा सोहळ्या आगळावेगळा असल्यामुळे डोळ्यात आनंदाश्रू आले बुधव-ारी हा सोहळा मोठ्या थाटात पार पडला.

तीर्थक्षेत्र पंढरपूर मध्ये म ुस्लिम कमले वाला हा समाज-सेवक अनेक वर्षापासून नाव-ावर उपाय आला त्यांना अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पारितोषिक मिळाले आहेत. समाजासाठी त्यांनी भव्य दिव्य काम करणारा समाजसेवक श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सदस्य ह भ प ज्ञानेश्वर महाराज जळगावकर यांच्या प्रभावाखाली आला व म हाराजांनी केलेल्या मदतीचा तो भारावून गेला. ज्ञानेश्वर महाराज जळगावकर यांची स्वतःच्या रक्ताने चित्र रेखाटले चित्राची प्रसिद्धी माध्यमांनी घेतली.

हे चित्र ह भ प जगावकर महाराज यांना सुपूर्द करण्यात आले गुरु शिष्याचे ते संबंध मंदिर समितीच्या कर्मचाऱ्यांनी सोशल मीडियावर प्रसिद्ध केली.

समाजसेवक मुस्लिम कम ली वाले हे आदर्श व्यक्तिमत्व आहे गरीब मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे काम त्यांनी आजवर केलेले आहे. त्यामुळेच त्यांना श्रीलंका येथे आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. श्रीलंकेत पुरस्कार मि ळाल्यानंतर कमलीवाले यांचे पंढरी नगरी आगमन झाले हा राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्यानंतर त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. या भूमिपुत्र सम ाजसेवकाचा मंदिर समितीकडून त्याचा सन्मान करण्यात आला.

## थोडक्यात...

### देगाव उड्डाणपूलवर अपघात ; दोघे जखमी




सोलापूर (प्रतिनिधी) विजापूर केगाव राष्ट्रीय महामार्गावर महामार्गावरील देगाव उड्डाणपूलवर अपघात झाल्याची घटना १२ एप्रिल रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास घडली. याप्रकरणी संजय किशनचंद मतानी (वय-५६-,रा.कवरगर, सिंधी कॉलनी,जळगाव) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून परवेज नजीर शेख (वय-२५,रा.मुक्ताईनगर बुऱ्हाणपूर रोड, जळगाव) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,वरील संशयित आरोपी यांनी त्याच्या ताब्यातील वाहन क्रमांक एमएच.२०.जी.व्ही.२४६३ यातून जात असताना वरील ठिकाणी रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणाने चालून फिर्यादी यांच्यासमोर एका अज्ञात ट्रकला पाठीमागून जोरात धडक दिल्याने फिर्यादीच्या चार चाकी वाहनाच्या पुढील भागाचे नुकसान होऊन फिर्यादीस व स्वतः गंभीर जखमी होण्यास कारणीभूत झाला आहे.असे फिर्यादीस नमूद आहे. तपास पोह. वाल्मिकी हे करीत आहेत.

# आजच्या राष्ट्रीय व राज्य नेतृत्वाच्या कार्याला एकात्म मानवदर्शन विचारांचे पाठबळ - कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा

## रुईया महाविद्यालयात २२ ते २५ एप्रिल दरम्यान पंडित दीनदयाळ उपाध्यायांच्या विचारांचा जागर; एकात्म मानवदर्शन हिरक महोत्सवाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : एप्रिल १९६५ मध्ये पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी प्रथमच रुईया महाविद्यालयात 'एकात्म मानवदर्शन' आणि 'अंत्योदय' या विचारांची मांडणी केली. जी भारताच्या प्रगतीचा आत्मा, संस्कृती आणि शाश्वततेची दिशा देणारी होती. त्याच ऐतिहासिक स्थळी, त्याच दिवशी, साठ वर्षांनी, २२ ते २८ एप्रिल २०२५ दरम्यान 'पंडित दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानवदर्शन हिरक महोत्सव' साजरा होणार आहे, अशी माहिती कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी पत्रकार परिषदेत दिली.



या कार्यक्रमाचे उदघाटन मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीसजी यांच्या हस्ते होणार असून,तामिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. या कार्यक्रमात महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन जी, केंद्रीय मंत्री मा. पियुष गोयल जी यांच्यासह कृष्ण गोपाल जी, मनमोहन वैद्य जी, सुनील आंबेकर जी, बि. एल संतोष जी आणि सुरेश सोनी जी यांसारखे ज्येष्ठ वक्ते लाभणार आहेत.

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी भारतीय राजकारणात एक अद्वितीय वैचारिक प्रवाह आणला. 'एकात्म मानव दर्शन', 'अंत्योदय' या सारख्या संकल्पना मांडून त्यांनी समाजातील शेवटच्या घटकाचा विकास व्हावा यासाठी प्रयत्न केला. आज पंतप्रधान आदरणीय श्री नरेंद्र मोदी जी, गृहमंत्री माननीय श्री अमित शाहजी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्र फडणवीसजी या सर्वांच्या कार्यात एकात्म मानवदर्शनचा प्रभाव स्पष्ट जाणवतो. आज देशपातळीवर आणि महाराष्ट्रात राबवल्या जाणाऱ्या सर्वच योजनांमधून पंडित दीनदयाळजींची मूल्ये झळकतात. अन्न, वस्त्र, निवारा या गरजांची पूर्तता, शिक्षण, नागरिकांचे संरक्षण या सर्वच गोष्टी आज समाजातील शेवटच्या व्यक्तीला मिळाव्यात यासाठी आमचे सरकार कार्यरत आहे. पंडितजींच्या विचारांनी केवळ तात्त्विक भूमिका मांडल्या नाहीत, तर सामान्य माणसाच्या उन्नतीसाठी कृतीचा मार्ग दाखवला. आज त्या विचारांची नव्याने उजळणी करताना, आपल्या कृतीत त्याचे प्रतिबिंब उमटले पाहिजे हाच सदर महोत्सव करण्याचा आमचा उद्देश आहे, असे कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी सांगितले.

या महोत्सवात भू सांस्कृतिक राष्ट्रवाद, भारत का स्व, लोकमत परिष्कार, भारताची विकासाची व्याख्या, पंडित दीनदयाळजींचे आर्थिक चिंतन या सारखे विषय श्रोत्यांना ऐकायला मिळणार आहेत. पंडितजींचे विचार जास्तीस्त जास्त लोकांनी ऐकण्यासाठी सर्वांनी एकत्र यावे असे आवाहन यावेळी कॅबिनेट मंत्री प्रभात लोढा यांनी केले. सदर कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी ekatmamanav-darshan.org या संकेतस्थळावर नोंदणी करायची आहे.

महोत्सवाचे आयोजन पंडित दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानवदर्शन हिरक महोत्सव समितीच्या माध्यमातून होणार असून, सहयोगी संस्था म्हणून लोढा फाउंडेशन आणि दीनदयाल शोध संस्थान कार्यरत आहेत.

पंडित दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानवदर्शन हिरक महोत्सव समितीच्या अध्यक्षस्थानी कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा असून, त्यांनीच या महोत्सवाला राज्यव्यापी स्वरूप देण्यासाठी विशेष पुढाकार घेतला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हा महोत्सव केवळ स्मरणरूपात न ठेवता, पंडितजींच्या विचारांवर आधारित समाज हिताचे उपक्रम राज्यभर राबवले जात आहेत.

# महिलांच्या सक्षमीकरणासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज : विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे

### मिरजगाव येथे ग्रामसंघांना १ कोटी ७६ लक्ष रुपयांच्या समुदाय गुंतवणूक निधीचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अहिल्यानगर : ग्रामीण महिलांमध्ये आत्मविश्वास वाढवून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यावर केंद्र व राज्य शासन अधिक भर देत आहे. बचतगटांची ही संकल्पना सर्वदूर रूजवून महिलांच्या सक्षमीकरणासाठी सामूहिक प्रयत्न करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले. अधिकाधिक महिलांना लखपती बनविण्यासाठी 'लखपती दिदी' ही योजना मिशन मोडवर राबविण्याची सूचनाही त्यांनी यावेळी केली.




कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथे प्रभागसंघांतर्गत महिला बचतगट व ग्राम संघांना समुदाय गुंतवणूक निधीचे प्रा. शिंदे यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात वाटप करण्यात आले. यावेळी उपविभागीय अधिकारी नितीन पाटील, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक राहुल शेळके, तहसीलदार गुरू बिराजदार, गट विकास अधिकारी रूपचंद जगताप, पोलीस निरीक्षक दौलत जाधव, उमेदचे जिल्हा अभियान व्यवस्थापक सोमनाथ जगताप, नंदू नवले आदी उपस्थित होते.

प्रा.राम शिंदे म्हणाले, समुदाय गुंतवणूक निधीमुळे महिलांना आर्थिक बळकटी मिळत असून स्थानिक विकास प्रक्रियेत महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढला आहे. अशा उपक्रमांमुळे खऱ्या अर्थाने महिलांचा समावेशक विकास शक्य होत असल्याचेही ते म्हणाले.

कर्जत तालुक्यामध्ये १ हजार ७२५ बचतगट, ८१ ग्रामसंघ असून विविध बँकांमार्फत ४१ कोटी रुपयांचे बचगटांना कर्ज स्वरूपात वितरण केले असून प्रधानमंत्री सूक्ष्म खाद्य उद्योग उन्नयन योजनेंतर्गत सीड कॅपीटल म्हणून ९ लक्ष ७० हजार रुपयांचा निधी ३६ उद्योगांना उपलब्ध करुन देण्यात आला आहे. केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून ३ कोटी पेक्षा अधिक फिरत्या निधीचे वाटप आज या निमित्ताने करण्यात येत असल्याचे सांगत सुमारे ५१ कोटी रुपयांचा निधी बचतगटातील महिलांना उद्योगासाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. बचगटांच्या माध्यमातून महिलांना संघटित करत त्यांना मान, सन्मान, प्रतिष्ठा मिळवून देण्याबरोबरच त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन महिलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन सर्वोतोपरी प्रयत्न करत असल्याचेही प्रा. शिंदे म्हणाले.

ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'लखपती दिदी' योजनेतून महिलांना लखपती करण्याचा संदेश दिला आहे. कर्जत तालुक्यात आतापर्यंत ५ हजार २१० महिला लखपती दीदी झाल्या आहेत. एवढ्यावरच न थांबता अधिकाधिक महिलांना योजनेतून लखपती बनविण्यासाठी ही योजना मिशन मोडवर राबविण्यात यावी. तसेच ग्रामीण भागात महिलांना ड्रोन तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देऊन त्यांना कृषी क्षेत्रात सक्षम करण्याच्या उद्देशाने 'ड्रोन दीदी' ही योजनाही प्रभावीपणे राबविण्यात यावी. ड्रोनच्या सहाय्याने कीटकनाशक फवारणी, पेरणी, जमिनीचे सर्वेक्षण आदी कामांचे महिलांना प्रशिक्षण देऊन महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करावे, असेही ते म्हणाले.

प्रास्ताविक प्रकल्प संचालक राहुल शेळके यांनी केले. यावेळी ड. प्रतिभाताई रेणुकर यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात बचतगटातील महिलांनी आपल्या यशोगाथाही मांडल्या.

राशीन येथे ग्रामसंघांना १ कोटी ३५ लक्ष रुपयांच्या समुदाय गुंतवणूक निधीचे वाटप

कर्जत तालुक्यातील राशीन येथे सभापती प्रा.राम शिंदे यांच्या हस्ते ग्रामसंघांना १ कोटी ३५ लक्ष रुपयांच्या समुदाय गुंतवणूक निधीचे वाटप करण्यात आले.

बचतगट, लाडकी बहीण, लखपती दीदी, ड्रोन दिदी यासारख्या विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीतूनच महिला समाजाच्या मुख प्रवाहात येऊन आपल्या व आपल्या कुटुंबांची आर्थिक उन्नती निश्चित साधू शकतील, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# नारळी सप्ताहाच्या माध्यमातून समाज घडविण्याचे मोलाचे कार्य : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बीड : बीड जिल्ह्याला नारळी सप्ताह, अध्यात्म व विचारांची मोठी परंपरा लाभली आहे. संत वामनभाऊ यांनी सुरू केलेली सप्ताहाची परंपरा अखंडपणे ९३ वर्षापासून सुरू आहे. या परंपरेच्या माध्यमातून समाज घडविण्याचे मोलाचे कार्य होत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले. गहिनीनाथ गडाचा विकास करताना बीड जिल्ह्याला पाणीदार जिल्हा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.



शिरूर कासार तालुक्यातील घाटशिळ पारगाव येथे श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या ९३ व्या नारळी सप्ताहासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, मठाधिपती विठ्ठल बाबा महाराज, वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी, आमदार सर्वश्री सुरेश धस, श्रीमती नमिता मुंदडा, श्रीमती मोनिका राजळे, माजी आमदार जयदत्त क्षीरसागर, माजी आमदार भीमराव धोंडे, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, विशेष पोलिस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा, जिल्हाधिकारी अविनाश पाठक उपस्थित होते.

श्री.फडणवीस पुढे म्हणाले, गहिनीनाथ गडाच्या विकासाचे काम सुरू असून अजूनही पुढे विकासाची ही कामे करायची आहेत. संतानी दाखविलेला भक्तीचा मार्ग समाजाने सोडलेला नाही. समाज घडविणाऱ्या या परंपरेत समाजातील सर्व घटकांचा सहभाग दिसून येत आहे. यामध्ये मुस्लिम समाज बांधव देखील सहभागी झाले, याचा आनंद आहे. आमचे नेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्यामुळे बीड जिल्ह्याशी वेगळे नाते निर्माण झाले आहे. आज मला वामनभाऊंच्या या सप्ताहाच्या परंपरेत सहभागी होऊन आशीर्वाद घेता आला याचा मनस्वी आनंद असल्याचे ते म्हणाले.

गहिनीनाथ गडावर येणाऱ्या प्रत्येक भक्ताची उत्तम व्यवस्था झाली पाहिजे, गडासोबतच या परिसरातील भाविकांच्या सोई सुविधांचा तसेच या परिसराचा देखील विकास करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे सांगून श्री.फडणवीस म्हणाले, मराठवाडा व बीड जिल्ह्याला कायमस्वरुपी दुष्काळमुक्त करण्यासाठी शासनाने कृष्णेचे पाणी आष्टीपर्यंत आणले आहे. ते पाणी संपूर्ण बीड जिल्ह्यात पोचविण्याचा आपला प्रण आहे. मराठवाडा व बीड जिल्ह्याला पाणीदार करण्यासाठी ५३ टीएमसी पाणी गोदाखोऱ्यात आणण्याच्या आराखड्यालादेखील मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे या परिसरातील दुष्काळ कायमचा मिटेल. आजच्या या पिढीने दुष्काळ पहिला, तो पुढच्या पिढीला पाहू देणार नाही, असेही श्री.फडणवीस यांनी स्पष्ट केले.

पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, संत वामनभाऊ, संत भगवान बाबा यांनी या भागातील लोकांना आध्यात्मिक गोडी निर्माण करणारी सप्ताहाची परंपरा सुरू केली, ती अखंडपणे सुरू आहे. गहिनीनाथ गडाच्या विकासासाठी तसेच बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मुख्यमंत्री आपल्यासोबत आहेत. त्यामुळे येत्या काळात बीड जिल्हा नक्कीच सुजलाम, सुफलाम होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी गडाचे मठाधिपती विठ्ठल महाराज यांनी संत वामनभाऊ यांनी ९३ वर्षापूर्वी सुरू केलेल्या अखंड नारळी सप्ताह परंपरेबाबत माहिती दिली. यावेळी बीड, अहिल्यानगर जिल्ह्यातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ज्येष्ठ पत्रकार रविंद्र बेडकीहाळ यांचा गौरव समारंभ

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रतिपादन

# पत्रकारांची लेखणी सत्याला आधार देणारी आणि समाजाला दिशा देणारी असावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सातारा : माध्यमांनी केवळ बातम्या देण्याचे काम करू नये तर समाजाचे प्रबोधन करण्याचेदेखील एक प्रभावी साधन तुम्ही आहात आणि तसे तुम्ही व्हावे. तुमची लेखणी सत्याला आधार देणारी आणि समाजाला दिशा देणारी असण्याबरोबरच सत्य, पारदर्शकता आणि नैतिकतेला महत्त्व दिले जावे, यामुळे पत्रकारितेचा गौरव वाढेल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.




मावळा फौंडेशन आणि जिल्ह्यातील सर्व साहित्यिक आणि पत्रकारांतर्फे ज्येष्ठ पत्रकार रविंद्र बेडकीहाळ यांचा गौरव समारंभ जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद पाटील, खासदार नितीन पाटील, आमदार सचिन पाटील, अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, कार्यवाह सुनिताराजे पवार, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी, पुणे विभागीय अधिस्वीकृतीचे अध्यक्ष हरीष पाटणे, जिल्हा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेंद्र सरकाळे आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, सर्व पत्रकारांनी बदलत्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेऊन स्वतःला अद्ययावत ठेवले पाहिजे. नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे ही आता काळाची गरज आहे, असे सांगून उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर आता पत्रकारितेतही होत आहे. हे तंत्रज्ञान आता पत्रकारांनीही अवगत केले पाहिजे. पत्रकारितेचे मूल्ये ही केवळ पत्रकारच जपू शकतात हेही लक्षात ठेवले पाहिजे. पत्रकारांवर हल्ले व्हायला सुरुवात झाली त्यावेळेस वेगवेगळ्या पद्धतीने कसे कायदेशीर संरक्षण देता येईल यासाठी प्रयत्न केला. आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना आणि या योजनेच्या अंतर्गत पात्र ज्येष्ठ पत्रकारांना दर महिन्याला आर्थिक सहाय्य दिले जाते असे सांगून अजित पवार म्हणाले, पत्रकार सन्मान योजनेअंतर्गत दरमहा ११ हजार रुपये दिला जाणारा सन्मान निधी २० हजार रुपये करण्याचा शासन निर्णय काढण्यात आला आहे. तसेच शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सव पत्रकार कल्याण निधीच्या माध्यमातून पत्रकारांच्या कुटुंबीयांना विविध प्रकारे आर्थिक सहाय्य मिळवून देण्याचे काम शासन करीत आहे. शासन म्हणून काम करत असतानाच समाजातल्या सर्व घटकांना आपल्याला बरोबर घेऊन जाता येईल, सर्वांचे प्रश्न हे कसे मार्गी लावता येतील यावर शासनाचा भर आहे.

आचार्य बाळशास्त्री जांभेकरांचे कार्य जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम ज्येष्ठ पत्रकार रविंद्र बेडकीहाळ यांनी केले. आचार्य बाळशास्त्री जांभेकर स्मारकाच्या उभारणीसाठी अतिशय मोलाची भूमिका त्यांनी बजावली. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे नाव आणि कार्य प्रत्येक मराठी माणसापर्यंत पोहोचवण्याचे महत्वाचे कार्य त्यांनी केले. श्री. बेडकीहाळ यांनी पत्रकारितेला एक दिशा दिली. त्यांनी केवळ पत्रकारिता व्यवसाय न मानता समाज जागृतीचं साधन म्हणून स्वीकारले. त्यांचे योगदान आजच्या तरुण पत्रकारांसाठी एक आदर्श आहे. त्यांनी लेखनातून आणि कार्यातून सामाजिक सुधारणा, शिक्षणाचा प्रसार आणि मराठी भाषेचा, संस्कृतीचा गौरव यांचा सातत्याने पुरस्कार केला. त्यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून सामान्य माणसांच्या प्रश्नांना वाचा फोडली आणि समाजातील दुरावस्थेवर प्रकाश टाकण्याचे काम केले. रवींद्रजींनी आपल्या आजपर्यंतच्या कारकिर्दीमध्ये पत्रकारितेप्रमाणे साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय काम केले आहे. मर्ढे येथील बा.सी. मर्ढेकर यांच्या स्मारकासाठी त्यांनी पाठपुरावा केला. हे स्मारक पूर्ण झाले असून याचे लोकार्पणही लवकर करु असेही, उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी सांगितले.

मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद पाटील म्हणाले, पत्रकार आणि साहित्य हे कुठल्या एका विचाराचे नसतात आणि कुठल्याही एका विचाराबरोबर ते जात नाहीत. जे दिसतं घडतं त्यावर ते त्यांचे मोकळेपणाने आणि स्पष्टपणे भाष्य करतात. श्री. बेडकीहाळ यांनी ही तत्वे जपली आहेत, परंतु त्यांनी पवार कुटुंबीयांशी आपले नाते हे आजपर्यंत ही अतिशय उत्तम पद्धतीने कायम ठेवले. पत्रकारिता, साहित्य क्षेत्राबरोबरच, समाजकारणसुद्धा उत्तम पद्धतीने करण्याचा प्रयत्न केला. जिल्ह्यातील कविवर्य बा.सी. मर्ढेकर, कवी यशवंत, कवी गिरीश आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आणि या जिल्ह्याचे सुपुत्र महाराष्ट्राचे पाहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांची परंपरा असलेल्या सातारा जिल्ह्यात रवींद्रजी बेडकीहाळ यांची वाटचाल, त्यांचा विचार आणि साहित्यक्षेत्रामध्ये त्यांनी केलेले काम हे निश्चितपणाने एक आगळावेगळा ठसा निर्माण करणारे आहे. सत्काराला उत्तर देताना श्री. बेडकीहाळ म्हणाले, आचार्य बाळशास्त्री जांभेकर सन्मान निधी ११ हजार रुपये होता. परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पाठपुरावा केल्यानंतर त्यांनी ५० कोटी रुपयांची तरतुद केली. आता हा निधी २० हजार रुपये करण्यात आला आहे. बा.सी. मर्ढेकर यांच्या स्मारकासाठी निधी कमी पडत होता. साडेबत्तीस लाख रुपये देण्यात आले. हे स्मारक पूर्ण झाले आहे. त्याचे लवकरात लवकर लोकर्पण व्हावे, अशी भावनाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी यांनी केले. या कार्यक्रमास साहित्य क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार, नागरिक उपस्थित होते.